India Media Monitor

# Lokmat

## Save the Doctor campaign by Doctors, students

**Date: 27/08/2013 | Edition: Mumbai | Page: 1 | Source: Bureau | Clip size (cm): W: 17 H: 9**

**Clip: 1 of 1**

# डॉक्टर, विद्यार्थ्यांची 'सेव्ह द डॉक्टर' मोहीम

## शांततेने निषेध : इंडियन मेडिकल असोसिएशनचा उपक्रम

**मुंबई :** भारतात दरवर्षी सुमारे ४८ ते ५६ हजार विद्यार्थी तर राज्यातून १५ ते २० हजार विद्यार्थी डॉक्टर होतात. मात्र देशात आणि राज्यात पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा कमी असल्यामुळे याचा परिणाम डॉक्टरांच्या करिअरवर होत आहे. याचा निषेध करण्यासाठी 'सेव्ह द डॉक्टर' ही मोहीम इंडियन मेडिकल असोसिएशनने हाती घेतली आहे.

'सेव्ह द डॉक्टर' या मोहिमेंतर्गत सोमवारी डॉक्टर, विद्यार्थ्यांनी महालक्ष्मी रेसकोर्सच्या येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या मैदानात मेणबत्त्या प्रज्वलित करून शांततेच्या मार्गाने निषेध केला. यावेळी एका भिंतीवर डॉक्टर, विद्यार्थ्यांनी हाताचे ठसे उमटवले आणि स्वाक्षऱ्या केल्या. डॉक्टरची पदवी दरवर्षी हजारो मुले संपादन करतात. मात्र मर्यादित जागांमुळे बऱ्याचशा डॉक्टरांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश मिळत नाहीत. यामुळे त्यांना एक वर्ष थांबावे लागते. सध्या राज्यात पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या फक्त ५ ते ६ हजार जागा आहेत; त्या वाढवाव्यात. पदवी अभ्यासक्रमाच्या तुलनेत या जागा वाढवाव्यात, यामुळे डॉक्टरांचे नुकसान होणार नाही, अशी प्रमुख मागणी असल्याचे सेव्ह द डॉक्टर मोहिमेच्या केंद्रीय विभागीय अधिकारी डॉ. सुरंजना बसक यांनी दिली. (प्रतिनिधी)

दत्ता खेडेकर



मेणबत्त्या प्रज्वलित करून निषेध करणारे डॉक्टर आणि विद्यार्थी